# मोफत पाठयपुस्तके-

**उदिष्टये-**

- शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
- विद्यार्थ्यांना टिकवणूक करुन त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.
- १००% पटनोंदणी करणे.

**पात्र लाभार्थी -**

- इयत्ता १ ली ते ८ वी च्या स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय शाळा व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थी
- **उपक्रमाची अंमलबजावणी —**
- U-DISE PLUS नूसार पात्र विद्यार्थी संख्या
- बालभारती कडे पाठयपुस्तकांची ऑनलाईन नोंदविणे.
- बालभारती डेपो अमरावती यांचेकडून तालुकास्तरावर मोफत पाठयपुस्तके वितरीत करणे
- तालुकास्तरावरुन पुस्तके लाभार्थी शाळास्तरावर वितरीत करणे.
- शाळेच्या पहिल्या दिवशी समारंभपूर्वक सर्व विदयार्थांना पुस्तक वितरण.
- सन २०२५-२६ मध्ये २५१८४८ विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तक समारंभपूर्वक शाळास्तरावरुन वितरीत.

# गणवेश सुविधा -

**उदिष्टये-**

- शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे
- विद्यार्थ्यांना  टिकवणूक करुन त्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे.
- १००% पटनोदणी करणे.

**लाभार्थी -**

- सन २०२५-२६ मध्ये इयत्ता १ ली ते ८ वी च्या स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय शाळामधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ.

**गणवेश सुविधा - उपक्रमाची अंमलबजावणी -**

- या उपक्रमांतर्गत प्रति विद्यार्थी रु. ३००/- याप्रमाणे  २ गणवेशाकरीता रु.६००/निधी मंजुर
- U-DISE PLUS वरुन पात्र विद्यार्थी संख्या निश्चिती.
- निधी शाळा व्यवस्थापन समितीकडे पंचायत समितीमार्फत वितरीत.
- शाळेच्या पहिल्या दिवशी पात्र लाभार्थ्यांना समारंभपूर्वक मान्यवरांच्या हस्ते गणवेश वाटप.
- सन २०२५-२६ मध्ये १६१४६६ विद्यार्थ्याना शाळास्तरावरुन मोफत गणवेश योजना ,बुट व पायमोजे वितरीत करण्यात आले आहे.

# महादीप योजना

- जिल्हा परिषद सेस फंडा मधून महादीप हा उपक्रम सन २०२१-२२ पासुन राबविण्यात येत आहे. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यामध्ये स्पर्धा परिक्षेची आवड निर्माण व्हावी,विद्यार्थी अवांतर वाचनाकडे प्रेरीत व्हावे व या सर्व बाबी शालेय अभ्यासक्रमाशी निगडीत असाव्यात हा मुख्य उददेश या उपक्रमाचा आहे.
- महादीप उपक्रमांतर्गत दरवर्षी ''महादीप एक संकल्प'' इ.५ वी ते ८ वी च्या अभ्यासक्रमावर आधारीत पूस्तिकेची निर्मिती तथा प्रकाशन विभागामार्फत करण्यात आलेले आहे. महादीप एक संकल्प २१-२२, महादीप एक संकल्प -२२-२३ आणि महादीप एक संकल्प -२३-२४, महादीप एक संकल्प २४-२५ याप्रकारे पुस्तकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- महादीप उपक्रमांतर्गत स्पर्धा परिक्षेच्या शाळास्तर-३, केंद्रस्तर-१, तालुकास्तर-२ आणि जिल्हास्तर-१ अशा एकूण ७ फेऱ्यांचे स्पर्धा परिक्षा घेऊन जिल्हास्तर फेरीमधून विद्यार्थ्यांची महादीप विमानवारी अंतर्भूत असलेल्या शैक्षणिक सहलीकरीता निवड केल्या जाते.
- सन २०२१-२२ मध्ये मैसुर, बंगलोर , २०२२-२३ मध्ये दिल्ली, शिमला, चंदीगड सन २०२३-२४ मध्ये मैसुर, बेंगलोर व २०२४-२५ मध्ये दिल्ली, आग्रा येथे सहलीचे आयोजन करण्यात आलेले आहे.
- शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये इयत्ता ५ वी ते ८ वी ४२विद्यार्थी सन २०२२-२३ मध्ये ५६, २०२३-२४ मध्ये ४२ व २०२४-२५ मध्ये ५२ द्यार्थ्यांची निवड शाळास्तर, केंद्रस्तर,तालुकास्तर,जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या परिक्षामधून करण्यात आलेली आहे.

**शैक्षणिक सत्र २०२४-२५**

- महादीप करीता २५०००००/- पंचवीस लक्ष रु.तरतुद सेस फंडामधून केल्या गेलेली आहे. व शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये हा उपक्रम निकषानुसार राबविण्यात आलेला आहे.
- सदर उपक्रमात शाळास्तर परिक्षांमध्ये एकूण ५२०००विद्यार्थी, केंद्रस्तर परिक्षांमध्ये एकूण २२००० विद्यार्थी तालुकास्तर परिक्षेमध्ये ९०००विद्यार्थी व या सर्व फेऱ्या मधूननिवड झालेले ६४५विद्यार्थी जिल्हास्तर परिक्षेमध्ये सहभागी झालेले आहेत.
- याजिल्हास्तर परिक्षेमधून निवड करण्यात आलेल्या एकूण ५२ विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दिल्ली व आग्रा येथे काढण्यात आलेली आहे.

**शैक्षणिक सत्र २०२५-२६**

- महादीप करीता शैक्षणिक सत्र २०२५-२६ मध्ये जि.प.सेस फंडामधून रु. ३००००००/- तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच उपक्रम राबविण्यात येत आहे. परिक्षेचे वेळापत्रक जाहिर करण्यात आलेले आहे.
- महादीप उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या ४ वर्षापासुन जिल्हयामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होत असुन जि.प.शाळांमध्ये स्पर्धा परिक्षा, नवोदय परिक्षा, स्कॉलरशीप तसेच इतर परिक्षांमध्येही या उपक्रमाची मदत झालेली आहे.